● शनिवार, दि. २८ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १५० वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जविघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांविरोधात कायदा करणार - कृषीमंत्री माणिकराव कोकाटे

**नाशिक** - शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांविरोधात कायदा करणार असल्याची घोषणा राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी नाशिकमध्ये केली. नव्या कायद्यात शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाईची तरतूद करणार असल्याचं कोकाटे यांनी म्हटलं. शेतकऱ्यांच्या फसवणूक करणाऱ्यांविरोधात कोणत्या कायद्यान्वये कारवाई करायची याची अडचण असते त्यामुळं नवा आवश्यक असल्याचं माणिकराव कोकाटे यांनी म्हटल.

आम्ही जोपर्यंत कायदा तयार करत नाही तोपर्यंत व्यापाऱ्यांच्या नावांची यादी करता येणार नाही. त्यामुळं जोपर्यंत कायदा होत नाही तोपर्यंत कोणत्या शेतकऱ्यांनी कोणत्या व्यापाऱ्यांना शेत माल विक्री करावा याबाबतची यादी करता येत नाही. शेतकऱ्यांच्या फसवूणक टाळण्यासाठी पोलिसांनी कारवाई कशी करावी याबाबतचा निर्णय पोलीस दलातील अधिकाऱ्यांना घ्यावा, अशा सूचना दिल्या आहेत,असं माणिकराव कोकाटे म्हणाले. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांविरोधात कारवाई करणारा कायदा आणताना पणनमंत्री जयकुमार रावल यांच्याशी चर्चा करणार असल्याचं कोकाटे म्हणाले.

कृषी खातं संवेदनशील असून मी त्याच्या दुप्पट संवेदनशील आहे. शेतकऱ्यांचे फोन उचलले जातील, कारवाई केले जातील, न्याय दिला जाईल. वेळ पडल्यास गृहमंत्री, मुख्यमंत्र्यांशी बोलणार आहे. याशिवाय दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी बोलणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी कठोर कायदा केला जाईल, मंत्रिमंडळात विषय मांडला जाईल, असं माणिकराव कोकाटे म्हणाले. पोलीस अधिकारी जाणीवपूर्वक व्यापाऱ्यांना वेगळी वागणूक देतात याबाबतचं प्रकरण समोर आल्यास कठोर कारवाई करणार असल्याचं माणिकराव कोकाटे म्हणाले.

शेतकऱ्यांच्या फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यावर कारवाई करण्यासाठी कठोर कायदा आगामी मार्च महिन्यात आणला जाईल, अशी माहिती कोकाटे यांनी दिली. नाशिकमध्ये व्यापाऱ्यांकडून फसवणूक झालेल्या शेतकरी आणि पोलीस प्रशासनाच्या बैठकीत कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी ही घोषणा केली. नाशिकमधील ही बैठक कृषीमंत्री माणिकराव कोकाटे



यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली. बैठकीला विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, सह्याद्री फार्मचे विलास शिंदें उपस्थित होते.

द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची काही व्यापाऱ्यांकडून फसवूणक झाल्याची प्रकरणं समोर आली आहेत. याप्रकरणी नाशिकच्या विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. मात्र, पोलीस तपास होत नसल्याने बैठक बोलावण्यात आली होती.

दरम्यान, पीक विमा घोटाळ्यासंदर्भात काही भागातील तक्रारी आहेत. जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन आणि पीक विमा कंपन्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करु असं माणिकराव कोकाटे म्हणाले. पीक विम्याचा चुकीच्या पद्धतीनं लाभ घेणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. पीक विमा कंपन्यांचे चुकीच्या कामात सहभागी असलेले अधिकारी कर्मचारी यांच्यावर देखील कारवाई करु, असं माणिकराव कोकाटे म्हणाले.

## कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली

### डॉ.मनमोहन सिंग यांच्याप्रती सोनिया गांधींनी व्यक्त केल्या भावना

**नवी दिल्ली** - देशाचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचं २६ डिसेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास निधन झालं. दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. देशाच्या प्रगतीत आणि अर्थिक विकासात डॉ.मनमोहन सिंग यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात त्यांनी दूरदृष्टीने अनेक योजना सुरू केल्या, त्याचा थेट फायदा सामान्य नागरिकांना झाला आहे. त्यामुळे त्यांच्या निधनामुळे अवघ्या देशावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनावर काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया गांधी यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. काँग्रेसच्या अधिकृत एक्स खात्यावरून या भावना प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

सोनिया गांधी म्हणतात, डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनाने आपण एक असा नेता गमावला आहे जो हुशार, कुलीनपणाचा आणि नम्रतेचा प्रतिक होता. त्यांनी आपल्या



देशाची मनापासून सेवा केली. काँग्रेस पक्षासाठी एक तेजस्वी आणि प्रिय मार्गदर्शक होते. त्यांची करुणा आणि दृष्टीने त्यांनी कोट्यवधी भारतीयांचे जीवन बदलले आणि सशक्त केले.

ते मनापासून भारतातील लोकांवर प्रेम करत होते. त्यांचे सल्ले आणि विचार आपल्या देशातील राजकीय विकासात प्रभावित ठरले. जगभरातील नेते आणि विद्वानांनी त्यांचा आदर आणि कौतुक केले, ते प्रचंड शहाणपण आणि उंचीचे राजकारणी म्हणून गौरवले गेले. डॉ. मनमोहन सिंग यांनी त्यांच्याकडे असलेल्या प्रत्येक उच्च पदावर तेज आणि वेगळेपणा आणला. यामुळे भारताला अभिमान आणि सन्मान मिळाला, असंही सोनिया गांधी म्हणाले.

माझ्यासाठी डॉ.मनमोहन सिंग यांचे निधन हे एक अतिशय वैयक्तिक नुकसान आहे. ते माझे मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक होते. ते खूप सौम्य होते. सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही मूल्यांप्रती त्यांची बांधिलकी खोल आणि पान २ वर

युवा आदर्श

### नरसिंहराव ...

विद्वान व्यक्तीमत्व
पी व्ही नरसिंहराव
शत धन्य जन्मदाते
छोटेसे वंगारा गाव
देशी परदेशी अशा
सोळा भाषेत सराव
वंदे मातरम् म्हणावे
निर्धारे केला ठराव
मुक्ती संग्रामात मोडे
निजामशाही उठाव
भूमी सुधारणा कायदा
आंध्रचे उंचावले नाव
आर्थिकघडी सावरी
टिकास्त्र सोसलेघाव
आर्थिक उदारीकरण
गुंतवणूक वृध्दीवाव
सेबी एनएस ई निर्मी
नवा आर्थिक पडाव
फुटीर चळवळ क्षीणे
दहशत वादा पाडाव
खासदार निधी आरंभ
तळागाळांशी प्रभाव
लूक ईस्ट धोरणाद्वारे
परराष्ट्रनिती अंतर्भाव
कठोर दृढ पंत प्रधान
विरोधा नलगे निभाव
भ्रष्टाचारकलंकधुतले
पुनश्च उजळले नाव

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

## देशाचा अर्थव्यवस्थेचा थोर सरदार हरपला

### काँग्रेसच्या स्व. मनमोहन सिंह यांना भावपूर्ण श्रद्धांजली



छाया/जावेद तांबोली

**जालना** - जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने देशाचे माजी पंतप्रधान थोर अर्थतज्ञ स्व. डॉ. मनमोहन सिंह यांना एका कार्यक्रमांमध्ये शुक्रवार रोजी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करण्याती आहे .

जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या शहर जिल्हा काँग्रेस कार्यालयात शुक्रवारी दुपारी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. यावेळी शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख महमूद , जालना तालुकाध्यक्ष वसंत राजे जाधव, अनुसूचित जाती विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष दिनकर घेवंदे, शहर जिल्हा काँग्रेस सेवादल शहर जिल्हाध्यक्ष शेख इब्राहिम, बाबासाहेब सोनवणे, नारायण वाडेकर, रघुवीर गुडे, बळीराम तिडके, जावेद अली, अजीम बागवान आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

भारत वर्षाचे आधुनिक शिल्पकार असलेल्या दिवंगत पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे निधन झाल्याने देशाची कधीही भरुन न निघणारी हानी झाली आहे. ते रिर्झव्ह बँकेचे गव्हर्नर आणि नंतर पंतप्रधान पदापर्यंत पोहोचले होते. मनमोहन सिंग यांनी खुल्या आर्थिक धोरणांचा पुरस्कार केल्याने भारताची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा वाढली होती. त्यांच्या निधनाने देशाचे नुकसान झाले आहे.

**- कैलास गोरंट्याल, माजी आमदार, जालना.**

कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी पंतप्रधान स्व. डॉ. मनमोहन सिंह यांच्या प्रतिमेस पुष्पांजली वाहण्यात आली यावेळी शहर जिल्हा अध्यक्ष शेख मेहमूद व दिनकर घेवंदे , तालुका अध्यक्ष पान २ वर

## निवासी सोलर पॅनल दुरुस्ती व देखभाल प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी** - पुणे येथील महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या संयुक्त विद्यमाने खुल्या प्रवर्गातील अमृत संस्थेच्या लक्षीत गटातील उमेदवारांसाठी मोफत सोलर पॅनल इंस्टॉलेशनवर आधारीत निवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम छत्रपती संभाजीनगर येथे दि.७ ते २४ जानेवारी २०२५ या अठरा दिवसाच्या कालावधीमध्ये सुशिक्षित बेरोजगार युवकांना तांत्रिक व उद्योजकीय प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सध्या ऊर्जेचा तुटवडा भासत असल्यामुळे शासनाचे धोरण सोलर ऊर्जा निर्मितीला प्राधान्य देण्याचे आहे. त्यामुळे सोलर ऊर्जा निर्मिती साठी शासनाच्या वतीने सबसिडीच्या दरामध्ये शेतकरी तसेच लाभार्थ्यांना सोलर पॅनल देण्यात येत आहेत. परंतु सदरील पॅनल इन्स्टॉलेशन मेंटेनन्स, दुरुस्ती करणारे मनुष्यबळ जालना जिल्ह्यामध्ये कमी प्रमाणात उपलब्ध आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून बेरोजगार युवकांना रोजगार व उद्योग करण्याची संधी या प्रशिक्षणाद्वारे उपलब्ध होणार असून प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींची निवड प्रत्यक्ष मुलाखती द्वारे करण्यात येणार आहे. तसेच जालना जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून एक याप्रमाणे प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. प्रशिक्षण हे खुल्या प्रवर्गातील अमृत लक्षित गटातील उमेदवारांसाठी म्हणजे (ब्राह्मण बनिया, वत्स, कम्मा, कायस्त, नायर, एयांगर, पाटीदार, बंगाली, पटेल, मारवाडी, यलमार, त्यागी, ठाकूर, मारवाडी, सेनगुनथर, सिंधी, राजपुरोहित, नायडू, यलमार ) इत्यादी प्रवर्गातील लाभार्थीना सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे सहभागी होता येईल.

प्रवेशासाठी पात्रता शिक्षण किमान बारावी पास, पदवीधर व तांत्रिक पदवीधारकास प्राधान्य असून वयोमर्यादा २१ ते ५० वर्ष आहे. जालना जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील उमेदवारांना प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे. अर्जासोबत शैक्षणिक गुणवत्तेचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, पॅन कार्ड, तहसीलचे अधिवास प्रमाणपत्र, जातीचा उल्लेख असलेल्या कोणत्याही शासकीय कागदपत्राचा पान २ वर

## नवीन दुग्ध व मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी** - केंद्र शासनामार्फत (सहकार से समृध्दी) अंतर्गत देशभरात ५४ उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत असून त्यामध्ये राज्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्याला आणि महिलांना समाविष्ट करुन दुग्ध व्यवसाय सहकारी संस्थामार्फत समृध्द करणे हा उद्देश निश्चित करण्यात आलेला आहे. या योजनेअंतर्गत एनडीडीबी व राज्य शासनामार्फत राज्यात सन २०२४-२५ या कालावधीत ५ हजार ५६ नवीन दुग्ध व्यवसाय सहकारी संस्था नोंदणी करण्याचे उदिष्ट निश्चित केले आहे. तरी जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त दुग्ध सहकारी संस्थांनी नोंदणी करावी, असे आवाहन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शन उत्साहात

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत जालना येथे जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शन उत्साहात पार पडले. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसिद्ध उद्योजक जितेंद्र राठी यांच्या हस्ते झाले. यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्राचार्य श्रीमती शेळके, प्रसिद्ध उद्योजक घनश्याम गोयल, लघुउद्योग भारती संघटनेचे अध्यक्ष सतीश भक्कड, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी अतुल केसकर, प्राचार्य राजेश धानोरकर, प्राचार्य डी.एम.राठोड, प्राचार्य एम .ए. के. शेख, जिल्ह्यातील सर्व आयटीआयचे गटनिर्देशक, शिल्पनिर्देशक व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

जिल्ह्यातील आठ शासकीय तर एका अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने आपला सहभाग नोंदवून ५९ प्रकल्प प्रदर्शनासाठी आणले होते. प्रदर्शन पाहण्यासाठी जालनातील विविध शाळेतील विद्यार्थी आले होते. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी व प्राचार्य यांच्या हस्ते पहिल्या दहा विजेत्यांना बक्षीस वितरण केले. लॉजिक गेट सिम्युलेटर अँड इलेक्ट्रिकल फॉल्ट सिम्युलेटर आयटीआय जालना, वन मिनिट सारी आयटीआय परतुर, ऑटोमॅटिक कंट्रोल रूम आयटीआय बदनापूर, सीड सोयलिंग मशीन आयटीआय जालना, पार्टी वेअर सारी आयटीआय भोकरदन, पावर जनरेशन ऑटो स्ट्रीट लाईट आयटीआय जाफराबाद, थीन रिंग्स विथ मेटल बार बेंडर आयटीआय मंठा, ३३- केवी इलेक्ट्रिक सब स्टेशन आयटीआय घनसावंगी, अग्निशामक नियंत्रण उपकरण आयटीआय अंकुशनगर, बेस्ट आऊट ऑफ वेस्ट आयटीआय जालना यांनी सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली मोरे यांनी केले. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या मार्गदर्शनात संस्थेतील प्राचार्य, गटनिर्देशक सर्व शिल्प निर्देशक व कार्यालयांनी कर्मचारी व भंडार कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. असे प्राचार्य, हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### लायन्स क्लबतर्फे ४ जानेवारीला त्रैभाषिक कविसंमेलन आयोजित

## संकलित निधीचा वापर मुलींच्या सर्वाइकल कॅन्सर लसीकरणासाठी होणार-जयश्री लड्डा

**जालना । प्रतिनिधी -** महिलांमध्ये होणाऱ्या सर्वाइकल कॅन्सर या गंभीर आजाराबद्दल जनजागृती आणि निधी संकलन करण्याच्या उद्देशाने लायन्स क्लब जालनातर्फे शनिवार दि. ४ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता श्री गणपती नेत्रालय रोडवरील कोठारी इंटरनॅशनल ड्रीम स्कूलमध्ये भव्य त्रैभाषिक कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

सर्वाइकल कॅन्सर हा ह्युमन पॅपिलोमा व्हायरस (HPV) संसर्गामुळे होणारा एक गंभीर आजार असून, यामुळे दरवर्षी भारतात अनेक महिला आपले प्राण गमावतात. मात्र, योग्यवेळी निदान आणि लसीकरणामुळे हा आजार टाळता येतो. लसीकरण हे महिलांसाठी या आजारावरील एक प्रभावी उपाय असून, ९ ते १४ वयोगटातील मुलींना ही लस दिल्यास रोगप्रतिकारक शक्ती अधिक मजबूत होऊन पुढील पिढीला या आजारापासून सुरक्षित ठेवता येते.

या कविसंमेलनातून जमा होणारा निधी जालना व परिसरातील मुलींच्या मोफत लसीकरणासाठी वापरण्यात येणार आहे. त्रैभाषिक कवी संमेलनात प्रसिद्ध शायर शबाना शबनम (इंदोर), शायर कमर सुरूर (अहिल्यानगर), प्रसिद्ध कवयित्री शोभा रोकडे पान २ वर



# संपादकीय

पान

## महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्व हरपले


भारताचे माजी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांचे गुरुवार दिनांक २६ डिसेंबर रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्व हरपले आहे. त्यांनी देशासाठी जे योगदान दिले देश कधीही ते विसरणार नाही. त्यांच्या निधनाने भारताची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. आज भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था मानली जाते. याचे सर्व श्रेय डॉ मनमोहन सिंग यांनाच जाते कारण तीस बत्तीस वर्षापूर्वी ते देशाचे अर्थमंत्री असताना देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी जे क्रांतिकारी निर्णय घेतले त्यामुळेच देशाची अर्यव्यवस्था सुदृढ झाली आहे. डॉ मनमोहन सिंग हे रूढ अर्थाने राजकारणी नव्हते तरीही त्यांनी समर्थपणे दहा वर्ष देशाचे नेतृत्व केले. त्यांनी देशासाठी दिलेले योगदान खूप महत्वाचे आहे. २६ सप्टेंबर १९३२ रोजी एका गरीब कुटुंबात डॉ मनमोहन सिंग यांचा जन्म झाला. ते लहान असतानाच त्यांचे मातृ छत्र हरपले. घरची परिस्थिती हालाखीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी १९५७ साली केंब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयातून पहिल्या श्रेणीत पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी १९६२ साली ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र विषयात डी फिल ही पदवी संपादन केली. उच्च शिक्षण घेऊन ते मायदेशात परतल्या वर त्यांनी पंजाब विद्यापीठ तसेच दिल्ली स्कूल ऑफ इकोनॉमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून सेवा केली. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक अशी त्यांची ओळख होती. याच दरम्यान त्यांनी युएनसिटीडी सचिवालयात त्यांनी काम पाहिले. अर्थशास्त्रातील विद्वान व्यक्ती अशी त्यांची ख्याती जगभर पसरू लागली त्यामुळे १९७१ साली त्यांना वाणिज्य मंत्रालयाचे आर्थिक सल्लागार ही जबाबदारी देण्यात आली. पुढील वर्षी म्हणजे १९७२ साली त्यांची अर्थ मंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लगार म्हणून नेमणूक झाली. अर्थ विभागाचे प्रमुख सल्लागार म्हणून त्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली. पुढे त्यांनी अर्थ मंत्रालयाचे सचिव, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष अशा महत्वाच्या पदावर त्यांनी काम केले. १९८७ ते १९९० या काळात त्यांनी जिनिव्हा येथील साऊथ कमिशनचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. १९९० पासून भारतीय राजकारणात अनेक मोठ्या घडामोडी घडत होत्या. राजकारण अस्थिर झाले होते. विश्वनाथ प्रताप सिंग यांचे सरकार पडले होते. चंद्रशेखर हे भारताचे पंतप्रधान बनले होते. भारताची अर्थव्यवस्था बिकट बनली होती. देश चालवण्यासाठी सरकारकडे पैसे नव्हते सरकारी तिजोरीत ठणठणाट होता म्हणून पंतप्रधान चंद्रशेखर यांनी देशाचे हजारो टण सोने जागतिक बँकेकडे गहाण ठेवले होते. केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगातच आर्थिक मंदी आली होती. अनेक देश डबघाईला आले होते अशातच काँग्रेसने चंद्रशेखर यांचा पाठिंबा काढून घेतल्याने लोकसभेच्या निवडणुका लागल्या होत्या. निवडणूक प्रचार दरम्यानच राजीव गांधी यांची हत्या झाल्याने काँग्रेसचे सूत्रे पी व्ही नरसिंह राव यांच्याकडे आली. त्या निवडणुकीत काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्याने नरसिंह राव पंतप्रधान बनले. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेताच कॅबिनेट सचिव नरेश चंद्र यांनी त्यांना आठ पानांचा अहवाल दिला. या अहवालात देशाची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट असल्याचे नमूद करण्यात आले होते. अशा परिस्थितीत राव यांना अशा चेहऱ्याची गरज होती जो आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि त्यांच्या विरोधकांना भारत आता जुन्या मार्गावर जाणार नाही असा संदेश देऊ शकेल. त्यांनी त्यावेळी त्यांचे सल्लागार पी सी अलेक्झांडर यांना विचारले की अर्थ मंत्रालयासाठी आंतरराष्ट्रीय मान्यता असलेल्या व्यक्तींचे नावे सुचवा तेंव्हा पी सी अलेक्झांडर यांनी आय जी पटेल व डॉ मनमोहन सिंग यांची नावे सुचवली. आय जी पटेल यांची आई आजारी असल्याने ते भारतात येऊ शकणार नाही मात्र डॉ मनमोहन सिंग यांना संपर्क केल्यास देशहीतासाठी ते अर्थमंत्री होतील असे पी सी अलेक्झांडर यांनी पंतप्रधानांना सांगितले. लगेचच नरसिंह राव यांनी डॉ मनमोहन सिंग यांच्याशी संपर्क केला आणि तुम्ही माझ्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री होताल का ? असे विचारले. मनमोहन सिंग यांनी त्यास होकार दिला आणि डॉ मनमोहन सिंग भारताचे अर्थमंत्री बनले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण धोरण आणले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी देशाची अर्थव्यवस्था सुधारलीच नाही तर ती वेगवान केली. त्या काळात डॉ मनमोहन सिंग यांना जागतिक पातळीवर सर्वोत्कृष्ट अर्थमंत्री म्हणून संबोधले जात असे. त्यांनी जागतिक बँकेकडे गहाण ठेवलेले सोने परत आणले. देशाच्या तिजोरीत भर घातली. देशात परदेशी गुंतवणूक आणली त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था तर सुधारलीच पण तरुणांना रोजगार देखील मिळाला. त्यांच्या उदारीकरणाच्या धोरणाला जगाने मान्यता दिली म्हणूनच त्यांना जागतिक उदारीकरणाचे जनक असे म्हणतात. १९९६ साली काँग्रेसचे सरकार गेल्यावर ते राज्यसभेत विरोधी पक्षनेते बनले. मे २००४ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले त्यावेळी सोनिया गांधी याच देशाच्या पंतप्रधान होतील असे सर्वांना वाटले पण सोनिया गांधींनी आपला आतला आवाज ऐकून पंतप्रधानपद नाकारले आणि डॉ मनमोहन सिंग यांची पंतप्रधानपदी निवड केली. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या काळातही त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. देशातील एकही व्यक्ती उपाशी झोपू नये म्हणून त्यांनी अन्न सुरक्षा सारखे महत्वाचे विधेयक आणले. सर्वांना रोजगार मिळावे म्हणून त्यांनी मनरेगा योजना आणली. त्यांच्या पंतप्रधान काळात परराष्ट्राशी भारताचे सौहार्दाचे संबंध होते. त्यांच्याच काळात भारत आणि अमेरिका यांचे संबंध दृढ झाले. सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेतल्यानेच जनतेने त्यांना दुसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याची संधी दिली. २००४ ते २०१४ असे सलग दहा वर्ष ते भारताचे पंतप्रधान होते. सलग दहा वर्ष देशाचे पंतप्रधान राहूनही ते कायम नम्र आणि विनयशील राहिले. अहंकाराचा लवलेशही त्यांना शिवला नाही. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अर्थशास्त्रावर आधारित ग्रंथ लीहले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. त्यांना अनेक विद्यापीठांनी मानाची डॉक्टरेट दिली. देशाचा दुसरा सर्वोच्च पुरस्कार पद्मविभूषण त्यांना प्राप्त झाला. त्यांच्या निधनाने देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्त्व, अभ्यासक आणि थोर देशभक्त गमावला आहे. त्यांच्या कामाप्रती असलेला व्यासंगी आणि शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचारणामुळे ते कायम स्मरणात राहतील. डॉ मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# १९ मार्चला का करतात उपवास

१९ मार्च १९८६ रोजी साहेबराव करपे व त्यांच्या कुटुंबियांनी केलेल्या आत्महत्याने सारा महाराष्ट्र हादरला होता. साहेबराव करपे यांनी लिहिल्या चिठ्ठीत त्यांच्या मृत्यूने सरकार शेतकरी प्रश्नाकडे लक्ष देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. झाले उलटे. सरकारने घ्यावी त्या गोष्टीची दखल घेतली नाहीच. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत गेले. देशात सुमारे साडे चार लाख शेतकऱ्यांना मृत्यू कवटाळावा लागला. शीतल भिसे असो की धर्मा पाटील असो की, सखाराम राठोड, रोज आत्महत्येची बातमी येते. आपण याचा कधी विचार करणार आहोत का? ह्या आत्महत्या कधी थांबतील? काय केले म्हणजे थांबतील?




सरकारे बदलली. काँग्रेसचे सरकार जाऊन भाजपचे सरकार आले पण आत्महत्या थांबल्या नाहीत. कर्ज माफी केल्या, पॅकेजेस दिली, विविध योजना आणल्या तरी आत्महत्या थांबल्या नाहीत. काय केले म्हणजे शेतकरी आत्महत्या थांबतील?

आम्ही याचा विचार केला. शेतकरीविरोधी (कमाल शेतजमीन धारणा, आवश्यक वस्तू व जमीन अधिग्रहण) कायदे या आत्महत्यांचे मूळ कारण आहेत. ते रद्द करणे गरजेचे आहे.

ज्यांना या आत्महत्यांचे ऐकून दुःख होते ते १९ मार्चला उपवास करतात! आपले काम करीत हा उपवास करता येतो. हवे तर सामूहिक रित्या देखील करता येतो. हा अन्नत्याग/ उपवास कोणत्याही राजकीय पक्षाचा/ संघटनेचा नाही. हा उपवास/अन्नत्याग संवेदनशील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे करायचा आहे. मी यंदाही १९ मार्चला उपवास करायचे ठरवले आहे! कारण या वर्षी देखील महाराष्ट्रात दर रोज सरासरी ५ ते ७ शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागल्या आहेत. २०१७ पासून लाखो किसानपुत्र हा उपवास करतात.

मला माहित आहे की, एक दिवसाच्या उपवासाने सरकार बधणार नाही. सरकारवर फारसा फरक पडणार नाही. पण यातून आपल्या संवेदना व्यक्त होतील. आपण शेतकऱ्यांच्या बाजूने आहोत, हा निर्धार पक्का होईल. तोच शेतकऱ्यांच्या हातपायातील शृंखला तोडणारा ठरेल.

शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यासाठी आपण करू एक दिवस उपवास! अन्नदात्यासाठी अन्नत्याग !



**अमर हबीब, आंबाजोगाई, ८४११९०९९०९**

# जागतिक मानवाधिकार दिनानिमित्त संस्था यूएन द्वारा डॉ. अनिल नायर थंपी आयोजित रमाकांत मुंडे याना पुरस्कार

**मुंबई -** जागतिक मानवाधिकार दिनानिमित्त यूएन, २५ डिसेंबर २०२४ रोजी नॅशनल कॉलेज, वांद्रे मुंबई येथे डॉ. अनिल नायर थंपी यांनी पुरस्कार शोचे आयोजन केले होते. या अनोख्या अवॉर्ड शोमध्ये अनेक सेलिब्रिटी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्यात पोलीस, लष्कर, मनोरंजन जगत तसेच इतर क्षेत्रातील व्यक्ती सहभागी झाल्या होत्या. या कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू आणि पुरस्कार विजेते उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्यानंतर विजेते भारावून गेले आणि त्यांनी डॉ.अनिल नायर थंपी आणि त्यांच्या टीमचे आभार मानले.

मंचावर उपस्थित मान्यवरांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. डॉ. अनिल नायर थंपी यांनी सामाजिक सेवा आणि शांततेचा संदेश देण्यासाठी वार्षिक जागतिक मानवाधिकार दिन (युनायटेड नेशन्स) पुरस्कारांचे आयोजन केले.

लष्कर, पोलीस, चित्रपट, फॅशन, अकादमी, व्यवसाय आणि मीडिया अशा विविध श्रेणीतील लोकांना या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

सन्माननीय अतिथी मुफ्ती मंजूर झियाई म्हणाले की, आपण एकमेकांसोबत प्रेम आणि शांततेने जगले पाहिजे हा संदेश मला द्यायचा आहे. ही संघटना एकता आणि अखंडतेसाठी कार्यरत आहे. आपण भारतीय आहोत याचा अभिमान असायला हवा. यशस्वी कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल डॉ.अनिल नायर थंपी यांचे अभिनंदन.

अंगावर ११ गोळ्या झाडणारे कमांडो प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ते म्हणाले की, एपीजे अब्दुल कलाम यांनी माझा सन्मान केला होता. भारतीय लष्करात कोणताही भेदभाव नाही. मानवतेपेक्षा मोठी कोणतीही जात नाही.

योगगुरू राधेश्याम जी म्हणाले की, हा कार्यक्रम डॉ. अनिल नायर थंपी यांच्या मेहनतीचे फळ आहे. अनेक महान व्यक्ती मंचावर उभ्या राहिल्या आहेत, त्यांच्यासोबत स्टेज शेअर करण्यात मी स्वतःला भाग्यवान समजतो.

डॉ.अनिल नायर थंपी यांनी सर्व पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. त्यानंतर मानद डॉक्टरेट पदवी देण्यात आली. सेलिब्रिटी अँकर सिमरन आहुजा हिने कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन केले. नसीर अली यांना सामाजिक कार्यासाठी मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. डॉ. राजीव एन शाह, डॉ. विष्णू (एसीपी) योग शिक्षक, डॉ. निषाद, डॉ. अग्नि एम जी, डॉ. विनोद सावंत जी यांना अमेरिकन विद्यापीठाने डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. शपथ घेताना सर्व पदवीधारकांनी सांगितले की, आम्ही शपथ घेतो की आम्ही समाजासाठी चांगले काम करू.



डॉ. सुचित्रा, मधुसूदन सुर्वे जी, श्री. मंगेश नायक सर, अनिता बोस सामाजिक कार्यकर्त्या, आशिष राऊत जी, शेख याहिया शेख इशाक (माझा महाराष्ट्र लाईव्ह) यांना नेल्सन मंडेला ह्युमन एक्सलन्स अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.

महात्मा गांधी नोबेल शांतता पुरस्कार डॉ.निशाद, अशोक राजगिरी, मोहम्मद अश्रफ, अब्दुल करीम, डॉ.नेहल मयूर, मुफ्ती मंजूर झियाई यांना प्रदान करण्यात आला.

या पुरस्कार सोहळ्यात सना सुरी, अभिनेत्री हनी भल्ला, नेहा जेतवानी, डॉ. अनिल कुमार, प्रदीप कामत, ऐश्वर्या नायर, एस किरण राव, ज्येष्ठ छायाचित्रकार रमाकांत मुंडे, स्नेहा, कोमल चौहान यांचाही गौरव करण्यात आला.

यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना डॉ.अनिल नायर थंपी म्हणाले की, आतापर्यंत विविध क्षेत्रातील अनेक व्यक्तिमत्त्वांना आपण या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

आम्ही मानवाधिकारांसाठी अनेक वर्षांपासून काम करत आहोत. देशातील २०२०१ राज्यातील तसेच परदेशातील लोक या क्षेत्रात कार्यरत आहेत.

डॉ.अनिल नायर हे भारतातील अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांचे राजदूत आहेत. मानवसेवा, शांतता आणि सामाजिक सुधारणा या क्षेत्रात ते वर्षानुवर्षे कार्यरत आहेत. ते म्हणाले की, आम्ही गेल्या ६ वर्षांत उदित नारायण यांच्यासह अनेक सेलिब्रिटींना पुरस्कार दिले आहेत. २०१८ पासून आम्ही हा प्रवास सुरू केला.

## महिलेच्या नावाने फेक इन्स्टाग्राम आयडी तयार करून चॅटिंग करणाऱ्यावर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी -** पमहिलेच्या नावाने फेक इन्स्टाग्राम आयडी तयार करून चॅटिंग करणाऱ्यावर जालन्याच्या सायबर पोलीस ठाण्यात काल दिनांक २६ गुरुवार रोजी गुन्हा दाखल करण्यात आलाय. जालन्याच्या तालुका जालना पोलिस ठाणे हद्दीतील धावडी गावातून हा प्रकार आहे. यात एका भामट्याने महिलेच्या नावाने फेक इन्स्टाग्राम आयडी तयार केला. त्या आयडीवर संबंधित महिलेचा फोटो प्रोफाइल वर ठेवून महिलेच्या मैत्रिणीशी संवाद साधून त्या संबंधित महिलेची बदनामी केली. दरम्यान, या प्रकरणी पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेने तक्रार दिल्यानंतर सदरचे अकाउंट कोण वापरत होते, हे अकाउंट कधी तयार झाले, कोणत्या मोबाइलमध्ये वापरले जात होतो यासह आदी चा तपास पोलिसांकडून आता केला जात आहे. दरम्यान फेक आयडी तयार करने अपराध असून कोणीही अशा प्रकारे फसवणुकीचा प्रयत्न करू नये. नसता पोलिसांकडून आरोपी विरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल




असा इशारा सायबर पोलीस ठाण्याचे योगेश चव्हाण यांनी दिला.

## जिल्हा पोलिस अधीक्षकांनी घेतला तालुका पोलिस ठाण्यांचा वार्षिक आढावा

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा पोलिस अधीक्षकांनी आज जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांचा वार्षिक आढावा घेतलाय. आज दिनांक २७ शुक्रवार रोजी दुपारी बारा वाजता जिल्हा पोलिस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी पोलिसांच्या वार्षिक कामांचा आढवा घेऊन पोलिस कर्मचाऱ्यांच्या वार्षिक कामाचे मूल्यांकन केलंय. जालना शहरातील तालुका जालना पोलिस ठाण्यातील या वर्षासातील विविध कामांचा आढावा घेऊन पोलिसांच्या साहित्याची पोलिस अधीक्षकांनी तपासणी केली आहे. यावेळी तालुका जालना पोलिसांनी परेडचे सादरीकरण केलं त्याचं देखील पोलिस अधीक्षकांनी निरीक्षण केलं आहे. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, तालुका पोलीस निरीक्षक सुरेश उणवणे, पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पान १ वरुन

### कधीही न भरून ...

अतूट होती. त्यांच्याबरोबर वेळ घालवायचा म्हणजे त्यांच्या ज्ञानाने आणि बुद्धिमत्तेने प्रबुद्ध होऊन, त्यांच्या प्रामाणिकपणाने आणि सचोटीने प्रेरित होऊन आणि त्यांच्या अस्सल नम्रतेने विस्मित होत असे, असे कौतुद्गारही त्यांनी काढले.

त्यांनी आपल्या राष्ट्रीय जीवनात अशी पोकळी सोडली आहे जी कधीही भरून निघणार नाही. आम्ही काँग्रेस पक्षात आहोत आणि भारतातील जनतेला सदैव अभिमान आणि कृतज्ञता राहील की आम्हाला डॉ. मनमोहन सिंग यांच्यासारखा नेता लाभला ज्यांचे भारताच्या प्रगती आणि विकासात योगदान अतुलनीय आहे, असं सोनिया गांधी म्हणाल्या.

### निवासी सोलार ...

पुरावा, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा कमी असल्याचे तहसील उत्पन्न दाखला, विवाहित असल्यास महिलांसाठी गॅझेट किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा पॅन कार्ड आदि प्रवेश अर्जासोबत छायांकित प्रतिमध्ये जोडणे आवश्यक आहे. www.mahaamrut.org.in या संकेतस्थळावर आपला अर्ज अपलोड करून, अर्जाची हार्ड कॉपी व अर्जासोबत आवश्यक कागदपत्राच्य छायांकित प्रती जोडून जिल्ह्यातील जिल्हा प्रकल्प अधिकारी या ठिकाणी प्रत्यक्ष अर्ज सादर करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्ज जिल्हा कार्यालयामध्ये सादर करण्याची अंतिम दि. १ जानेवारी २०२५ आहे. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संबंधित जिल्ह्याच्या प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एम.सी.ई.डी), द्वारा मराठा पार्क बिल्डींग विशाल कॉनर छ. संभाजीनगर (औरंगाबाद) चौफुली, जालना फोन नं. ०२४८२- २२०५९२ या ठिकाणी संपर्क साधावा व आपला प्रवेश अर्ज सादर करावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### संकलित निधीचा ...

(अमरावती), सुनंदा शेळके (बारामती) आणि जालना येथील प्रसिद्ध कवयित्री संजीवनी तडेगावकर ह्या आपल्या रचना सादर करणार आहेत. कवी संमेलनाच्या माध्यमातून साहित्यप्रेमींना आपल्या आवडत्या कवींना प्रत्यक्ष भेटण्याची आणि त्यांच्या सृजनशीलतेचा आनंद घेण्याची संधी मिळणार आहे. तसेच, या उपक्रमाद्वारे महिलांच्या आरोग्याविषयी समाजात जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

कार्यक्रमाविषयी अधिक माहितीसाठी लायन्स क्लबच्या सदस्यांची संपर्क साधावा व जास्तीत जास्त नागरिकांनी या कविसंमेलनाला उपस्थित राहून महिलांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलून नव्या पिढीला सुरक्षित व निरोगी भविष्य देण्यासाठी सढळ हाताने मदत करावी, असे आवाहन लॉयन्स क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्डा, सचिव मंजू श्रीमाली यांच्यासह पदाधिकारी आणि सदस्यांनी केले आहे.

### देशाच्या अर्थव्यवस्थेचा ...

वसंत जाधव यांनी श्रद्धांजली वाहताना स्व. डॉ. मनमोहन सिंह यांच्या गौरवशाली कार्याची प्रशंसा करून देश कठिण काळात असताना त्यांनी देश सावरला खऱ्या अर्थाने ते अर्थतज्ञ व्यवस्थेचे सरदार होते त्यांच्या कुशल कार्य प्रणालीमुळे देश आज सक्षमरित्या उभा असल्याचे त्यांनी गौरव उदगार काढले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब सोनवणे यांनी केली.



जालना शहरातील सहकार बँक कॉलनी येथील गोल्डन किड्स प्री स्कूल येथे ख्रिसमस सण उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका दुर्गा सचिन मुंडे व सहशिक्षिका सीमा मुंडे, अमृता देशपांडे स्वाती सांगोळे, शितल जोशी, भारती ठोसर व विद्यार्थी सांताक्लॉजच्या वेशभूषेत होते.

### तालुक्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी जिप्राशा येनोरा शाळेला मिळाली संधी

# येनोरा जिल्हा परिषद शाळेने तालुकास्तरीय प्रश्नमंजुषा मध्ये प्रथम क्रमांक पटकावला




**परतूर । प्रतिनिधी -** परतुर तालुक्यातील येनोरा येथील जिल्हा परिषद शाळेने तालुकास्तरीय प्रश्नमंजुषा मध्ये एक ते पाच व सहा ते आठ अशा दोन्ही गटांमध्ये जि .प .प्रा शा येनोरा या शाळेने अत्यंत चुरशीच्या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला व त्यांची निवड जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषेसाठी झालेलीआहे. तरी सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.या स्पर्धेसाठी परतुर गट साधन केंद्राचे गट समन्वयक बागल, विषय तज्ञ रोडगे मॅडम, राठोड, व केंद्रप्रमुख,थोटे. यांची उपस्थिती होती. एक ते पाच गटांमध्ये द्वितीय क्रमांक रायगव्हाण या शाळेचा आला व तृतीय क्रमांक बाबुलतारा या शाळेचा आला.सहा ते आठ गटांमध्ये द्वितीय क्रमांक पांडेपोखरी व तृतीय क्रमांक बाबुलतारा या शाळेचा आला.

प्रथम क्रमांक मिळवलेल्या जि .प प्रा .शा येनोरा येथील विद्यार्थी. प्रश्नमंजुषा स्पर्धा जिल्हास्तरासाठी पात्र (सन २०२४-२५ या वर्षाकरिता) परतूर तालुक्यातून प्रथम आलेले संघ.

इयत्ता १ ते ५ मधील विद्यार्थी रूद्र संतोष होंडे, ईश्वरी लक्ष्मण ,ईश्वरी लक्ष्मण भुंबर,शितल अशोक भुम्बर,

इयत्ता ६ ते ८ मधील विद्यार्थी गायत्री रंगनाथ भुंबर , अक्षरा पंढरीनाथ भुंबर, ओमकार अशोक दवंडे

स्पर्धेसाठी सहभाग नोंदवणारे शिक्षक मुख्याध्यापक, गाडेकर. लिपणे , श्रीमती वाकोडे, झरेकर , देवकर, शेळके, सोनवणे,

श्रीमती वाकोडे मॅडम

सर्व शिक्षक वृंद यांचे हार्दिक अभिनंद करण्यात आले.

# इनरव्हील क्लब जालना होरायझनतर्फे अपंग निवासी शाळेला सोलार हिटर भेट




**जालना । प्रतिनिधी** - सामाजिक उपक्रम राबविण्यात सदैव अग्रेसर असलेल्या इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनतर्फे आरटीओ कार्यालयाजवळील अपंग निवासी विद्यालयासाठी सोलार हिटर प्रदान करण्यात आले.

येथील समाजसेवी महेंद्रप्रसाद भक्कड यांची अमेरिकास्थित कन्या सौ. मयुरी विनय सारडा, विनय सारडा, वंश सारडा आणि अनुज सारडा यांनी सोलार हिटर संच उपलब्ध करून दिला तर इनरव्हील क्लब जालना होरायझनतर्फे सोलारसाठी पाण्याची टाकी, सोलार स्टॅन्ड दिले तसेच सोलारची फिटिंग उभारणी करून दिली. सोलर हिटरचे लोकार्पण ममता भक्कड, शैला भक्कड, इनरव्हील क्लब जालना होरायझनच्या अध्यक्ष ड. अश्विनी धन्नावत, पुनम खंडेलवाल, विद्यालयाचे अधीक्षक श्री. लहाने यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी बोलताना ड. अश्विनी धन्नावत म्हणाल्या की, सौर उर्जेचा उपयोग करणे ही काळाची गरज आहे. सोलर हिटरद्वारे उष्ण पाण्याची सोय उपलब्ध होऊन ऊर्जेची मोठ्या प्रमाणावर बचत करता येते. अपंग निवासी शाळेसारख्या संस्थांमध्ये सोलर हिटरमुळे आर्थिक बचत होईलच, शिवाय पर्यावरणाचे रक्षण होण्यास हातभार लागेल. या सोलर हिटरद्वारे विद्यार्थी आणि शिक्षक यांना सोयीस्कर पद्धतीने गरम पाणी मिळेल, ज्यामुळे त्यांचे दैनंदिन जीवनमान सुधारेल. सारडा व भक्कड परिवाराने या उपक्रमाला आर्थिक हातभार लावून समाजाप्रती आपली जबाबदारी दाखवून दिली आहे. अशा प्रकारच्या प्रकल्पांनी शाळेतील विद्यार्थ्यांचे जीवन अधिक सुकर होईल आणि त्यांना शिक्षणासाठी अनुकूल वातावरण मिळेल, असे त्या म्हणाल्या. विद्यार्थी आणि शिक्षकांनी या दातृत्वाबद्दल आभार मानले आणि सोलर हिटरमुळे निर्माण होणाऱ्या सोयीसाठी समाधान व्यक्त केले. यावेळी विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नोंदणीकृत होमिओपॅथी वैद्यक व्यावसायिकांनी आधुनिक वैद्यकशास्र प्रमाणपत्र (सीसीएम पी) अभ्यासक्रम पूर्ण केल्यास, त्यांना आधुनिक वैद्यकशास्त्र वैद्यक (विषमचिकित्सा) पद्धतीने व्यवसाय करण्यास परवानगी देण्यात आली आहे

# जिल्ह्यात यलो अलर्ट; सोसाट्याचा वारा

**जालना । प्रतिनिधी -** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात दि. २७ व दि. २८ डिसेंबर २०२४ रोजी यलो अलर्ट जारी केला असून दि. २६ डिसेंबर २०२४ रोजी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. तसेच दि. २७ डिसेंबर २०२४ रोजी तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा (ताशी ५० ते ६० कि.मी. प्र.ता. वेगाने) गारपीट होण्याची तसेच दि. २८ डिसेंबर २०२४ रोजी तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा (ताशी ३० ते ४० कि.मी. प्र. ता.वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची तर दि. २९ डिसेंबर २०२४ रोजी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे.

## जालना जिल्ह्यासाठी स्थानिक सुट्या जाहिर

**जालना -** जिल्हाधिकारी यांनी कॅलेंडर वर्ष २०२५ करिता जालना जिल्ह्यासाठी तीन स्थानिक सुट्टया जाहिर केल्या असुन त्या पुढील प्रमाणे आहे. बुधवार दि. ८ जानेवारी २०२४ रोजी राजाबाग सवार दर्गा उत्सव, सोमवार २९ सप्टेंबर २०२५ रोजी मस्त्योदरी देवी नवरात्र उत्सव (सप्तमी) व सोमवार दि.२० ऑक्टोंबर २०२५ रोजी नरक चतुर्दशी अशा तीन सुट्टया जालना जिल्ह्यासाठी जाहिर करण्यात आल्या असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.



केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ बहुजन समाज पार्टीने जालन्यात निषेध व्यक्त करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. यावेळी आंदोलनात उपस्थित महाराष्ट्र कोषाध्यक्ष अब्दुल राऊफ, चंद्रमणी गाडेकर, सिद्धार्थ मोरे, राहुल करनाडे, इस्माईल भाई, विजय ओमप्रकाश भगत, रवींद्र गवई , धरमचंद गराडवाल, एडवोकेट अर्चना मिलिंद खिल्लारे, ॲड. भालमोडे, ॲड. कांतीलाल हिवाळे, कैलास जाधव, अनिल तायडे , प्रकाश काकडे, मिलिंद खिल्लारे, गणेश हिवाळे, दिलीप हिवाळे, प्रकाश बोडले, विनायक झिने, राजेंद्र पंडित, मनोहर रत्नपारखे, रामचंद्र मघाडे, राम जोहरे, संजय खरात, प्रकाश बोडले, राहुल चाबुकस्वार आदींची उपस्थिती होती.

# जिल्हा परिषद शाळेतील विघार्थ्यांना मिळणार वॉटर फिल्टरचे पाणी

### जळगाव सपकाळ शाळेची डिजीटलकडे वाटचाल



**जळगाव सपकाळ । प्रतिनिधी -** भोकरदन तालुक्यातील जळगाव सपकाळ येथील जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळेमध्ये शासनाच्या वतीने विविध योजनेतुन मंजुर झालेल्या साहित्य व कामाचे उदघाटन मंगळवारी गावातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

जळगाव सपकाळ येथील जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळेत पहिली ते आठवी पर्यत विघार्थी शिक्षण घेतात यासाठी विघार्थी यांना भौतिक सुविधेसह आरोग्य व देखरेखीच्या अनुषंगाने शासनाने जिल्हा परिषद विभागातुन जिल्हा नियोजन समितीतुन शाळेसाठी वॉटर फिल्टर देण्यात आले तर ग्रामपंचायत निधीतुन शाळेसाठी सि.सी.टिव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे तसेच सर्व शिक्षा अभियानातुन शाळेची विजेची समस्या दुर व्हावी यासाठी पाच वॅट क्षमतेचे सौर उर्जेवरील बॅटरी संचलीत इनव्हटर बसविण्यात आले असुन सुरक्षा वाल कंपाऊट भिंत सुध्दा तयार करण्यात आली त्यामुळे जळगाव सपकाळ येथील जिल्हा परिषद शाळेची वाटचाल डिजीटल शाळेकडे वाटचाल म्हणुन पाहायला मिळणार आहे शासनाने मंजुर केलेल्या विविध साहित्य व कामांचे काम पुर्ण झाल्यावर यांचे उदघाटन मंगळवारी सकाळी दहा वाजता गावातील प्रतिष्ठीत नागरिक गणपतराव सपकाळ तसेच रमेश दादा सपकाळ यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी गावातील सरपंच कु. विशाखा साळवे, जिल्हा परिषद सदस्या सुनिता शिवाजी सपकाळ,सोसायटीचे चेअरमन गणेश सपकाळ,सोसायटीचे सचिव बंडु सपकाळ,ग्रामपंचायत सदस्य आर.ए.सपकाळ,प्रशांत बुरुकुले,डॉ. शालीकराम सपकाळ,विष्णु सपकाळ,अशोक सपकाळ,भागाजी सपकाळ,यासह बंकु सपकाळ, के.के.सपकाळ,गजानन सपकाळ,शामकांत सपकाळ,केतन साळवे,शिवाजी सपकाळ,तसेच शालेय समितीचे अध्यक्ष गोकुळ सपकाळ,उपाध्यक्ष रामेश्वर दौड,शालेय समितीचे सदस्य गणेश नाना,राजु साळवे,गणेश राजगुरु यासह शाळेचे केंद्रप्रमुख बि.यु.सपकळ,मुख्याध्यापक नासेर शेख,सुभाष साबळे,नितीन बाहेकर,पंडीत,टाकळकर,गायकवाड यासह शिक्षकांची उपस्थीती होती.

# आधुनिक ईव्हीएमरुपी मनुस्मृती फोडण्यासाठी दोन लाख कार्यकर्ते तयार करणार - वामन मेश्राम

बोरघर । माणगाव । रायगड महाड येथे क्रांती मूवी महाड येथे २५ डिसेंबर मनुस्मृती दहन दिनाच्या शतकपुर्व वर्षाच्या पूर्वतयारी अंतर्गत भारत मुक्ती मोर्चा आयोजित राज्यस्तरीय परिवर्तन यात्रा आयोजित कार्यक्रमात भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा वामन मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित केली होती. उदघाटक मा डॉ. आदेश घोणे व विचार मंचावर विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

बामसेफ/भारत मुक्ती मोर्चा व ऑफशुट विंगचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी चौक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून चवदार तळे येथील बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून, आधुनिक मनुस्मृती ईव्हीएम च्या विरोधात घोषणा देत रॅली क्रांती स्तंभाकडे निघाली यामध्ये असंख्य महिला पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते. क्रांती स्तंभ येथिल डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून नियोजित सभेला




खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

विषय:- १) ईव्हीएम ला रद्द करण्यात यावे ईव्हीएम मानवाकडून किंवा द्वारे हॅक होण्याची दाट शक्यता आहे विधान किंवा ईव्हीएम च्या द्वारे द्विदलीय संसदीय लोक तंत्राला पुन्हा स्थापित करणे आणि बहुजन समाजाला वास्तविक सत्तेपासून वंचित करणे हे शासक जातीचे एक षडयंत्र आहे गंभीर चर्चा. २) मी बुद्धीचा तुटवडा भरून काढेल परंतु मला निष्ठेची माणसं पाहिजेत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर. ३) बंधू आर्य राया दयावान व्हावा जाळून टाकावा म्हणून ग्रंथ ज्योतिबा फुले. ४) बहुजन समाजात जातीच्या आधारावर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात अत्याचार प्रतिबंध कायदा तसेच धार्मिक आधारावर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात धार्मिक अत्याचार प्रतिबंध कायदा तयार करणे एक गंभीर चर्चा.

अध्यक्षता करताना मा.वामन मेश्राम साहेब यांनी सर्व विषयांवरती मार्गदर्शन केले.ते बोलत असताना आधुनिक मनुस्मृती ईव्हीएम आहे.आणि ती फोडण्यासाठी २ लाख कार्यकर्ते तयार करायचे आहेत.असे आव्हान केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर आपल्या समाजाला अर्थात बहुजन समाजाला शासन करती जमात बनऊ ईच्छित होते. मात्र आज सामाजिक चित्र उलटे आहे. समाजात ब्राम्हणी व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी बहुजन समाजाचे नेते काम करत आहेत. हि बाब अत्यंत गंभीर आहे. येणाऱ्या काळात बहुजन समाजाला एकत्र करून आपली शासन व्यवस्था प्रस्थापित होण्यासाठी काम करावे लागेल यासाठी सर्व समाजाने एकत्र येणे गरजेचे आहे, असे आवाहन माननीय मेश्राम साहेब यांनी केले.

सभेचे उदघाटक मा.डॉ.आदेश घोणे यांनी आपले मार्गदर्शनपर विचार मांडले. प्रस्ताविक मा.अशोक सकपाळ भारत मुक्ती मोर्चा महाड यांनी केले. सुत्रसंचलन एड.राकेश मोरे यांनी केले. वक्तागण- मा.प्रा. संजय दाभारडे,मा. सम्यक हाटे, एड.यशवंत गंगावणे, मा.गायत्री घोणे,मा. विनायक हाटे, मा.मनोज महाले,मा.मधुकर म्हात्रे,मा.लता शिंगाडे, मा.एड.सविता गायकवाड. यांनी आपले विचार मांडले. आभार प्रदर्शन मा.प्रवीण धोत्रे यांनी केले.

# ‘डॉ. मनमोहन सिंह यांचं निधन ही राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्राची मोठी हानी’

## अर्थमंत्री अजित पवार यांची भावपूर्ण श्रद्धांजली



**मुंबई** - भारतासारख्या विकसनशील देशाला जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या वाटेवर नेण्याचा क्रांतिकारी निर्णय घेणारे आणि तो निर्णय कमालीचा यशस्वी करुन दाखवणारे देशाचे माजी पंतप्रधान, जागतिक किर्तीचे अर्थतज्ञ डॉ. मनमोहन सिंह यांचं निधन ही देशाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्राची मोठी हानी आहे. भारताला आर्थिक महासत्ता बनवण्याच्या कार्याचा पाया डॉ. मनमोहन सिंह यांनी रचला. गेल्या अनेक दशकात आलेल्या प्रत्येक जागतिक मंदीसमोर भारताची अर्थव्यवस्था पाय घट्ट रोवून भक्कमपणे उभी राहिली, याचं बहुतांश श्रेय डॉ. मनमोहन सिंह यांनी देशाचे अर्थमंत्री आणि पंतप्रधान म्हणून त्याकाळात घेतलेल्या दूरदष्टीपूर्ण निर्णयांना आहे, असे सांगत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी डॉ. मनम ोहन सिंह यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त करुन त्यांना आदरांजली वाहिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, डॉ. मनमोहन सिंह यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देशाचे अर्थमंत्री आणि पंतप्रधान म्हणून यशस्वीपणे काम केलं. जागतिक अर्थव्यवस्थेचा सखोल अभ्यास, दूरदष्टीपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता आणि देशातील सर्वसामान्य जनतेच्या कल्याणाचा ध्यास या बळावर त्यांनी भारतीय अर्थव्यवस्था कठीण परिस्थितीतून रुळावर आणली. अर्थव्यवस्थेचा पाया अधिक मजबूत केला. मजबूत अर्थव्यवस्थेचा उपयोग सम ाजाला होईल याची काळजी घेतली. भारतीय अर्थव्यवस्थेला आज जे मजबूत स्वरुप प्राप्त झाले आहे, त्याचं मोठं श्रेय डॉ. मनमोहन सिंह यांना आहे. त्यांच्या निधनाने देशाचं सभ्य, सुसंस्कृत, विश्वासार्ह नेतृत्वं हरपलं आहे. देश आपल्या सुपुत्राला मुकला आहे. देशाचे यशस्वी अर्थमंत्री, साहसी पंतप्रधान आणि जनमानसाचा विश्वास प्राप्त केलेला नेता म्हणून ते कायम स्मरणात राहतील.

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन

# सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर

**मुंबई** - माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंह यांचे २६ डिसेंबर २०२४ रोजी नवी दिल्लीतील एम्स रुग्णालयात निधन झाले.भारत सरकारने सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला असून हा दुखवटा २६ डिसेंबर २०२४ पासून १ जानेवारी २०२५ पर्यंत (दोन्ही दिवस समाविष्ट) पाळला जाईल.

या काळात राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर उतरवला जाईल आणि कोणतेही शासकीय मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जाणार नाहीत. डॉ. मनमोहन सिंह यांच्यावर शासकीय इतमाम ात अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत. तसेच, त्यांच्या अंतिम संस्काराच्या दिवशी देश-विदेशातील सर्व भारतीय दूतावासांमध्येही राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर उतरवण्यात येईल.

# जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नंबर प्लेट लावण्याचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी** - सर्वोच्च न्यायालयाने सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी अर्थात हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्याचे निर्दे श दिले आहेत. त्यानुसार राज्य शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादीत केलेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट बसविण्याचा निर्णय घेतला आहे. अशा वाहनांना ही नोंदणी क्रमांकाची पाटी असणे बंधनकारक असणार आहे. तसेच १ एप्रिल २०१९ नंतर खरेदी केलेल्या वाहनांवर उत्पादकामार्फत उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट बसविण्यात आल्यामुळे अशा वाहनधारकांना पुन्हा ही नंबर प्लेट लावण्याची आवश्यकता नाही.

नोंदणीकृत वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची उच्च सुरक्षा नोंदणी क्रम ांकाची नंबर प्लेट महत्वाची आहे. तरी सर्व संबंधीत




नंबर प्लेट बसविणे सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. तसेच रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे, नंबर प्लेटमध्ये होणारी छेडछाड व बनावटगिरी रोखणे, वाहनांमुळे होणारे गुन्हे कमी करणे, यासाठी वाहनमालकांनी ही उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट बसविण्यासाठी परिवहन विभागाच्या https://transport. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. या कामासाठी परिवहन विभागाकडून तीन कंपन्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांच्यामार्फतच ही नंबर प्लेट लावणे बंधनकारक आहे. इतर कोणत्याही अनधिकृत विक्रेत्याकडून लावलेल्या नंबर प्लेटची नोंद केंद्र सरकारच्या डेटाबेसमध्ये होवू शकणार नाही. ही नंबर प्लेट बसविण्याकरिता ३१ मार्च २०२५ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी. याविषयी काही अडचण, तक्रार किंवा शंका असल्यास परिवहन विभागाच्या पोर्टलवर किंवा ytccomp.tpt-mhgov.in या ईमेलवर संपर्क करावा, असे आवाहन परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी केले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.